लोकमत



शिरढोण, ता. कोरेगाव येथील शाळेच्या इमारत लोकार्पण लीना देशपांडे यांच्या हस्ते झाले. यावेळी शहाजी क्षीरसागर उपस्थित होते.

# शिक्षणाचा पाया भक्कम करण्यासाठी कटिबद्ध : देशपांडे

लोकमत न्यूज नेटवर्क

धामणेर : 'ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम करण्यासाठी गुणवत्तेबरोबर भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यास भारत फोर्ज कंपनी कटिबद्ध आहे,' असे प्रतिपादन कंपनीच्या सी. एस. आर. विभागाच्या प्रमुख लीना देशपांडे यांनी केले.

शिरढोण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या नूतन इमारतीच्या लोकार्पण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी धामणेरचे सरपंच शहाजी क्षीरसागर, जयदीप लाड, जयवंत घोरपडे, संजय शेडगे, संजय घोरपडे, शेखर कदम उपस्थित होते.

लीना देशपांडे म्हणाल्या, 'गावातील शाळांच्या इमारती चांगल्या दर्जाच्या असतील तर तेथील मुलांनाही शिक्षण घेताना जास्त आनंददायी वाटते. मुलांचे भविष्य घडत असते, यासाठी शैक्षणिकदृष्ट्या खेडी सुधारली पाहिजेत.'

शहाजी क्षीरसागर म्हणाले, 'शिरढोणमध्ये विकास कामात राजकारण न करणारे ग्रामस्थ असल्यामुळे गावचा चांगला विकास होत आहे, अशा गावांना कंपनी प्राधान्य देत असते.'

संजय शेडगे यांनी सूत्रसंचालन केले. जयवंत घोरपडे यांनी आभार मानले. (वा.प्र.)

Hello Satara
Page No. 8 Oct 25, 2020
Powered by: erelego.com

कर्मयोगी २४ ऑक्टो. २०२०

## शिक्षणाचा पाया भक्कम करण्यासाठी भारत फोर्ज कटिबध्द:लीना देशपांडे



## बापूजी साळुंखे महाविद्यालयात शिक्षणमहर्षी २०१९-२० अंकाचे प्रकाशन

